ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Analysis of Intellectual Property<br>**Dr. D. V. Shinde** | 1 |
| 2 | Industrial Sector in Indian Economy and Covid-19<br>**Dr. Arun Kharde** | 7 |
| 3 | Various Streams in Sri Auraobindo's Perseus, the Deliverer<br>**Dr. Anuradha S. Jagdale** | 13 |
| 4 | Academic Libraries and Reading Habits in Marathwada Division<br>**Kishan K. Talgane** | 18 |
| 5 | Comparative Study of Personality Traits of Combative and Team Game State Level Players of Maharashtra<br>**Sagar Ulhas nandurkar** | 23 |
| 6 | नागार्जुन के 'बलचनमा' उपन्यास में जनवादी चेतना<br>**डॉ. विरनाथ पांडुरंग हुमनाबादे** | 28 |
| 7 | कार्ल मार्क्स आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था<br>**डॉ. बालाजी ग्यानोबा कांबळे** | 32 |
| 8 | तुघलक घराण्याची सत्ता स्थापनेतील गाजी मलिकाचे योगदान<br>**शिवाजी पाडदे** | 37 |
| 9 | १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेत आलेले राजकिय व सामाजिक संदर्भ<br>**डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड** | 46 |
| 10 | महात्मा गांधी यांची ग्रामीण विकासाची संकल्पना<br>**डॉ. एस. व्ही. शेटे** | 56 |

Issue : XIX, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.014
ISSN 2250-169X
June 2020 To Nov. 2020 

9

# १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेत आलेले राजकिय व सामाजिक संदर्भ

**डॉ. हरिश्चंद्र मधुकर गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख,
शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. महाविद्यालय,
परंडा, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र) भारत

**Research Paper - Marathi**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात ग्रामीण जीवनातील अनपेक्षित प्रतिकुल वास्तवाच्या जडणघडणीस अनेक घटक कारणीभुत आहेत. त्यामध्ये ग्रामीण समाजाच्या आत्महितास अपकारक ठरणा-या जीवन धारणांचा व जीन पध्दतीचा हातभार लागल्याचे दिसुन येते. शेती व्यवसायामध्ये नवनवीन पध्दतीचा त्याने केलेला स्वीकार अत्याधुनिक बी-बियाणांचा खतांचा, औषधांचा केलेला अतिरेक निसर्गसृष्टीचा विध्वंस, व्यवहारीक शेती ग्रामीण युवकाने स्वीकारलेला चंगळवाद, शहरी जीवनाचे आकर्षण व्यसनाधिनता, नव्या पध्दतीने स्वीकारलेली अंधश्रध्दा, जातीचा अभिमान याचा झालेला अतिरेक ग्रामीण जीवनाला लागलेली किड, जुन्या आदर्शवादी परंपरेला खाऊ लागली. दिखाऊ धर्माचरण व त्या आचारणापाठीमागचे पाप वाढीस लागले याहीपेक्षा उध्दवस्त ग्रामीण जीवनाच्या पाठीमागे उध्वस्त ग्रामीण जीवनाला जबाबदार असणारे महत्वाचे कारण म्हणजे आजचे स्वार्थी व भ्रष्ट राजकारण होय.

देश स्वातंत्र्य झाल्यानंतर महात्मा गांधींची हत्या झाली गांधीनी दिलेला 'खेडयाकडे चला' हा नारा हवेत विरला. गांधी विचार संपुष्टात आला. घटनेने दिलेल्या नियमाचा भंग होऊ लागला. राजकारण हे समाजाच्या उन्नतीसाठी असते याचा विसर पडला. देशाचं हित देशाभिमान, देशभक्ती जनसेवा हे राजकारणाचे स्त्रोन अपवाद वगळता राजकारण्यांनी सोडुन दिला. देशद्रोही कृतीला धाण आले अनेक पक्षाची देशात स्थापना झाली.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सर्वच क्षेत्रामध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला. शिक्षण क्षेत्र प्रसार माध्यमे चळवळी धर्म इत्यादीवर राजकारणांचा प्रभाव वाढला अनेक राजकिय पक्ष गावोगावी स्थिरावले विविध पक्षाच्या विविध शाखा ग्रामीण परिसरात निर्माण झाल्या. खेडया पाडयातला समाज वेगवेगळया पक्षात विभागला गेला. स्वत:चा कुटूंबाचा समाजाचा कुठलाही विचार न करणारी कार्यकर्ता नावाची जात निर्माण झाली. राजकीय पक्षाने ग्रामीण भागातील तरूण युवा पिढीचा स्वत:च्या स्वार्थासाठी वापर करायला सुरूवात केली. ज्या गावात ते जन्मले, वाढले त्या गावाच्या गावपणाला व माणुसकीला संपवण्याचे काम राजकारण्यांनी सुरू केले. हे बदलते वास्तव, बदलते राजकारण वाढीस लागले.